ePaper
विद्यमान विधानसभेचा आज शेवटचा दिवस!
॥ वर्ष - 8 । अंक -138 ॥ UDYAM-MH-26-0158827 ॥



महाईन्यूज (TM)
लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

## आतील पानांत


- भारताने विक्रमांची रांगच लावली!
- हेडच्या विकेटनंतर टीम इंडियाचा जल्लोष!
- संसद नियंत्रित करण्याचा प्रयत्न!
- इम्रान खान यांच्या सुटकेसाठी आंदोलन!


www.mahaenews.com | मंगळवार, दिनांक 26 नोव्हेंबर 2024 | पुणे आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews

## मुख्यमंत्रीपदी देवेंद्र फडणवीस यांचे नाव निश्चित

# केंद्रात नरेंद्र अन् राज्यात देवेंद्र!

### » महायुतीचा पॅटर्न : एकनाथ शिंदे, अजित पवार उपमुख्यमंत्रीपदी



। मुंबई । महाईन्यूज ।

**महायुतीचं अखेर ठरलं आहे, मुख्यमंत्रिपदी देवेंद्र फडणवीस विराजमान होतील असे संकेत आहेत एकनाथ शिंदे आणि अजित पवार असे दोन उपमुख्यमंत्री असतील अशी शक्यता आहे. महायुतीला प्रचंड यश मिळाल्यानंतर मुख्यमंत्री कोण होणार याच्या विविध चर्चा सुरु होत्या. मात्र आता देवेंद्र फडणवीस हेच महाराष्ट्राचे मुख्यमंत्री असतील, अशी विश्वसनीय सूत्रांची माहिती आहे.**

यासह, महायुतीचा पॅटर्नही समोर आला आहे. सत्तेत देवेंद्र फडणवीस मुख्यमंत्री आणि एकनाथ शिंदे तसंच अजित पवार हे दोघं उपमुख्यमंत्री राहणार आहेत. महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीचा निकाल लागला आहे. महाराष्ट्रात महायुतीला २३९ जागांचं रेकॉर्डब्रेक बहुमत मिळालं आहे. महायुतीचा मुख्यमंत्री कोण? हे निश्चित व्हायचं आहे. अजित पवार यांनी देवेंद्र फडणवीस यांच्या नावाला अनुमोदन दिलं आहे. तर एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेकडून अद्याप असं काही म्हणणं समोर आलेलं नाही. देवेंद्र फडणवीस मुख्यमंत्री होऊ शकतात अशी चर्चा आहे.

दुसरीकडे शरद पवार यांनी लाडकी बहीण आणि बटेंगे तो कटेंगे या घोषणेमुळे मतं गेली म्हटलं आहे. तर संजय राऊत यांनीही महायुतीवर टीका केली आहे.

### राज्याला स्थिर सरकार देऊ : अजित पवार

अजित पवारांना कराड येथे प्रसारमाध्यमांच्या प्रतिनिधिंनी विचारलं की महायुतीचा मुख्यमंत्रिपदाचा फॉर्मुला काय? त्यावर अजित पवार म्हणाले, आमचा काही फॉर्म्युला वगैरे नाही. आम्ही तिघं बसू आणि ठरवू. काल माझी पक्षाच्या नेतेपदी निवड झाली आहे. एकनाथ शिंदेंची देखील शिवसेनेच्या नेतेपदी निवड झाली आहे. आम्ही दोघे आणि देवेंद्र फडणवीस चर्चा करुन राज्याला स्थिर सरकार देऊ. लोकांच्या अपेक्षा खूप वाढल्या आहेत.

## मुख्यमंत्री एकनाथ शिंदे नाराज.. ?

महायुतीत मुख्यमंत्रिपद भारतीय जनता पक्षालाच जाणार असल्याचं जवळपास स्पष्ट झालेलं आहे. त्यामुळे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे नाराज झाले आहेत. आपली नाराजी त्यांनी पक्षाच्या आमदारांपर्यंत पोहोचवलेली आहे. संध्याकाळनंतरच्या सगळ्या गाठीभेटी त्यांनी रद्द केल्या आहेत. वर्षावर पोहोचलेल्या शिवसेनेच्या आमदारांदेखील शिंदे भेटलेले नाहीत.

मुख्यमंत्रिपद जाणार असल्यानं शिंदेंचे आमदारदेखील नाराज झाले आहेत. महायुतीला शिंदेंच्या नेतृत्वात विधानसभेत नेत्रदीपक यश मिळाल्यानं मुख्यमंत्रिपद त्यांच्याचकडे ठेवण्यात यावं, अशी शिवसेना आमदारांची आग्रही मागणी होती. पण ती पूर्ण होताना दिसत नाही. पुढचा मुख्यमंत्री भाजपचाच असणार यावर जवळपास शिक्कामोर्तब झालेलं आहे. त्यामुळे शिंदे नाराज झाले आहेत.

## समर्थनार्थ कुणीही एकत्र येऊ नये

महायुतीच्या प्रचंड विजयानंतर राज्यात पुन्हा एकदा आपले सरकार स्थापन होणार आहे. महायुती म्हणून आपण एकत्रित निवडणूक लढवली आणि आजही एकत्रच आहोत. माझ्यावरील प्रेमापोटी काही मंडळींनी सर्वांना एकत्र जमण्याचे, मुंबईत येण्याचे आवाहन केले आहे. तुमच्या या प्रेमासाठी मी अत्यंत मनापासून ऋणी आहे. मात्र अशा पद्धतीने माझ्या समर्थनार्थ कुणीही एकत्र येऊ नये, असे आवाहन मी करतो, असं एकनाथ शिंदे यांनी ट्वीटमध्ये म्हटलं आहे.

## सत्तास्थापना लांबणीवर

सत्तास्थापनेचा मुहूर्त लांबणीवर जाण्याची शक्यता वर्तवली जात आहे. अद्याप महायुतीचा मुख्यमंत्री कोण होणार किंवा मुख्यमंत्रिपदाचा फॉर्म्युला काय असणार, हे स्पष्ट झालेलं नाही. महायुतीच्या बैठकीत दोन फॉर्म्युलांवर चर्चा झाल्याची चर्चा आहे. पहिला फॉर्म्युला म्हणजे अडीच-अडीच वर्ष मुख्यमंत्रिपद वाटून घेण्याचा. या फॉर्म्युलासाठी एकनाथ शिंदे यांची शिवसेना आग्रही असल्याचं बोललं जात आहे. त्यानुसार, केवळ भाजप आणि शिवसेना यांना मुख्यमंत्रिपद वाटून दिलं जाणार आहे.

# मंत्रिपदासाठी पवारांच्या आमदाराचं लॉबिंग

## माजी नगरसेवकांची बैठक घेऊन आग्रही मागणी

। पिंपरी ।
महाईन्यूज । प्रतिनिधी।

**पिंपरी विधानसभा मतदारसंघाचे आमदार अण्णा बनसोडे यांनी मंत्रीपदासाठी माजी नगरसेवकांसह बैठक घेऊन लॉबिंग केली. गेल्या ३५ ते ४० वर्षांपासून पिंपरी-चिंचवड शहराला मंत्रीपद नाही. यामुळे अण्णा बनसोडे यांची शिफारस करत असल्याची माहिती शहराध्यक्ष योगेश बहल यांनी दिली आहे.**



पिंपरी- चिंचवड मधील हॉटेलमध्ये राष्ट्रवादी अजित पवार गटाच्या माजी नगरसेवकांनी बैठक घेऊन अण्णा बनसोडेंसाठी ठराव केला आहे. अण्णा बनसोडे हेदेखील मंत्रीपदासाठी आग्रही आहेत. माजी नगरसेवकांचा अजित पवार आदर करतील असा विश्वास बनसोडे यांनी व्यक्त केला आहे.शहराध्यक्ष योगेश बहल म्हणाले, ४२ वर्षांपासून शहरात मंत्री पद नाही. या शहराची ३० लाखांहून अधिक लोकसंख्या आहे. अण्णा बनसोडे हे दुसऱ्यांदा निवडून आले आहेत. अण्णा बनसोडे यांना मंत्रिपद द्यावं अशी आमची आग्रही मागणी आहे. यासाठी माजी नगरसेवकांची बैठक बोलावली आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि अमित शहा यांना पत्र देणार असून अजित पवारांना देखील मुख्यमंत्री करावं आणि अण्णा बनसोडे यांना मंत्रिपद द्यावं यासाठी ही मागणी केली. अण्णा बनसोडे यांच्यासाठी अजित पवारांकडे आमची आग्रहाची मागणी आहे. सर्व माजी नगरसेवक मुंबईत अजित पवारांची भेट घेणार आहेत. यासाठी ही बैठक बोलावण्यात आली, तसा ठराव करण्यात आला आहे. अशी माहिती योगेश बहल यांनी दिली आहे. सर्व माजी नगरसेवक एकत्र आले आहेत. त्यांनी मला मंत्रिपद मिळावं म्हणून ठराव केला. या ठरावाचा अजित पवार आदर करतील आणि मला मंत्रिपद देतील असा विश्वास अण्णा बनसोडे यांनी व्यक्त केला. पिंपरी- चिंचवड मधील हॉटेलमध्ये राष्ट्रवादी अजित पवार गटाच्या माजी नगरसेवकांनी बैठक घेऊन अण्णा बनसोडेंसाठी ठराव केला आहे. अण्णा बनसोडे हेदेखील मंत्रीपदासाठी आग्रही आहेत. माजी नगरसेवकांचा अजित पवार आदर करतील असा विश्वास बनसोडे यांनी व्यक्त केला आहे.शहराध्यक्ष योगेश बहल म्हणाले, ४२ वर्षांपासून शहरात मंत्री पद नाही. या शहराची ३० लाखांहून अधिक लोकसंख्या आहे. अण्णा बनसोडे हे दुसऱ्यांदा निवडून आले आहेत. अण्णा बनसोडे यांना मंत्रिपद द्यावं अशी आमची आग्रही मागणी आहे. यासाठी माजी नगरसेवकांची बैठक बोलावली आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि अमित शहा यांना पत्र देणार असून अजित पवारांना देखील मुख्यमंत्री करावं आणि अण्णा बनसोडे यांना मंत्रिपद द्यावं यासाठी ही मागणी केली. अण्णा बनसोडे यांच्यासाठी अजित पवारांकडे आमची आग्रहाची मागणी आहे. सर्व माजी नगरसेवक मुंबईत अजित पवारांची भेट घेणार आहेत. यासाठी ही बैठक बोलावण्यात आली, तसा ठराव करण्यात आला आहे. अशी माहिती योगेश बहल यांनी दिली आहे. सर्व माजी नगरसेवक एकत्र आले आहेत. त्यांनी मला मंत्रिपद मिळावं म्हणून ठराव केला. या ठरावाचा अजित पवार आदर करतील आणि मला मंत्रिपद देतील असा विश्वास अण्णा बनसोडे यांनी व्यक्त केला.

### 42 वर्षांपासून शहरात मंत्री पद नाही

पिंपरी- चिंचवड मधील हॉटेलमध्ये राष्ट्रवादी अजित पवार गटाच्या माजी नगरसेवकांनी बैठक घेऊन अण्णा बनसोडेंसाठी ठराव केला आहे. अण्णा बनसोडे हेदेखील मंत्रीपदासाठी आग्रही आहेत. माजी नगरसेवकांचा अजित पवार आदर करतील असा विश्वास बनसोडे यांनी व्यक्त केला आहे.शहराध्यक्ष योगेश बहल म्हणाले, ४२ वर्षांपासून शहरात मंत्री पद नाही. या शहराची ३० लाखांहून अधिक लोकसंख्या आहे. अण्णा बनसोडे हे दुसऱ्यांदा निवडून आले आहेत. अण्णा बनसोडे यांना मंत्रिपद द्यावं अशी आमची आग्रही मागणी आहे. यासाठी माजी नगरसेवकांची बैठक बोलावली आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि अमित शहा यांना पत्र देणार असून अजित पवारांना देखील मुख्यमंत्री करावं आणि अण्णा बनसोडे यांना मंत्रिपद द्यावं यासाठी ही मागणी केली. अण्णा बनसोडे यांच्यासाठी अजित पवारांकडे आमची आग्रहाची मागणी आहे.

# निधी मिळवण्यासाठी ताकद लावायला हवी

## चारपाच दशके या शहरात राहणाऱ्या पक्क्या पुणेकरांसही हेच का ते पुणे

। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**विधानसभा निवडणुकीचे पडघम चांगलेच वाजले. शहरात महायुतीच्या आमदारांचे वर्चस्वही प्रस्थापित झाले. आता हे सारे आमदार एकत्र येऊन या शहराच्या भविष्याचा विचार करतील, अशी अपेक्षा करता येईल.**

पक्ष विसरून शहराचे प्रश्न एकत्रितपणे सोडवण्यासाठी सर्वपक्षीय आमदारांनी एकत्र येण्याची खरे तर अधिक गरज. पण पक्षीय राजकारण, व्यक्तिगत हेवेदावे आणि आपापले स्वार्थ यामुळे सगळ्या आमदारांनी एकत्र येणे हे केवळ स्वप्नरंजन. येत्या दहापंधरा वर्षांत पुण्याचे चित्र इतके पालटेल, की गेली चारपाच दशके या शहरात राहणाऱ्या पक्क्या पुणेकरांसही हेच का ते पुणे, असे वाटेल. बदलाचा हा वेग आवरणे शक्य नसले, तरी त्याला निदान योग्य ते वळण देणे तरी शक्य आहे. त्यासाठी नवनिर्वाचित आमदारांनी एकत्र येण्याची खरी गरज आहे.राज्याकडे असलेल्या सर्वात महत्त्वाच्या प्रश्नांमध्ये पुण्याचे पाणी हा अग्रस्थानी. शहराच्या परिसरात पाणी साठवणाऱ्या चार धरणांमध्ये साठवण्यात येणारे पाणी केवळ पुणे शहराचीही तहान भागवू शकतील की नाही, अशी चिंता आत्तापासूनच निर्माण होऊ लागली आहे. पुणे जिल्ह्यातील




शेतीसाठी या धरणांतून पाणी देणे आवश्यक असतानाही, शहराला प्राधान्य देण्याच्या आमदारांच्या आग्रहामुळे कालव्यातून इंदापूरपर्यंत पाणी पोहोचण्यात अडचणी येतात. शहराची लोकसंख्या दिवसेंदिवस वाढत असताना, उपलब्ध पाणी पुरवायचे कसे, हा प्रश्न भेडसावत राहणार, याचे कारण या शहराला गरजेपेक्षा कितीतरी अधिक प्रमाणात धरणातून पाणी मिळत राहते, मात्र त्यातील सुमारे चाळीस टक्के पाण्याची गळती होते. ही गळती थांबवण्यासाठी पाणी पुरवठा करणाऱ्या शहरातील जलवाहिन्या जुन्या पुराण्या झाल्या आहेत.

### वेतन देण्याची नामुष्की निर्माण होते

शहराच्या सर्व भागात किमान नागरी सुविधा मिळण्यासाठी सातत्यपूर्ण वाढीव उत्पन्नाची कायमस्वरूपी यंत्रणा निर्माण करणे अत्यावश्यक ठरणार आहे. ज़कात रद्द करून स्थानिक संस्था कर लागू झाला आणि त्यानंतर जीएसटी लागू झाल्यानंतर पालिकेच्या तिजोरीत रोजच्या रोज़ जमा होणारा निधी रोडावला. सर्वसाधारण कर ही काही पालिकेच्या उत्पन्नाची सोच नव्हे. आमदारांनी राज्यातील सगळ्याच महापालिकांची आर्थिक स्थिती सुधारण्यासाठी एकत्रितपणे प्रयत्न करण्याची गरज आहे. राज्यातील काही महापालिकांची आर्थिक स्थिती इतकी खालावली आहे, की कर्मचाऱ्यांचे वेतन देण्याची नामुष्की निर्माण होते आहे.

त्या बदलण्याची आवश्यकता असतानाही, त्यासाठी पालिकेकडे पुरेसा निधी नाही. तो राज्याकडून मिळवण्याशिवाय पर्याय नाही. नव्या आमदारांनी त्यासाठी प्रयत्न करायला हवेत. हे काम वेळेत पूर्ण झाले नाही, तर भविष्यात पुणे शहराला पाण्याअभावी कायमच तहानलेले राहावे लागणार आहे. महापालिकेच्या उत्पन्नाचे स्रोत सातत्याने घटत आहेत. केवळ बांधकाम शुल्कातून मिळणारा निधी ही कायमस्वरूपी व्यवस्था असू शकत नाही.

## पिंपरी-चिंचवडकरांची अपेक्षा, आता संधी मिळावी!

# मंत्रीपदासाठी ‘मेरिट’च्या आधारे महेश लांडगे ‘डार्क हॉर्स’!

## राजकीय वर्तुळात महायुतीच्या मंत्रीमंडळाची उत्सुकता

। पिंपरी-चिंचवड । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**लोकसभा निवडणुकीनंतर महाविकास आघाडीकडून प्रचंड ‘टार्गेट’ करण्यात आलेले भाजपाचे आमदार आणि राज्याचे नेते देवेंद्र फडणवीस यांचे निष्ठावंत आमदार महेश लांडगे यांना मंत्रीपदी संधी मिळावी, अशी अपेक्षा सर्वसामान्य पिंपरी-चिंचवडकरांमधून व्यक्त होत आहे.**



राज्यात २०१९ मध्ये महाविकास आघाडीची सत्ता आली. त्यावेळी पिंपरी-चिंचवडमध्ये महाविकास आघाडीच्या स्थानिक नेत्यांकडून भाजपाचा आमदार म्हणून महेश लांडगे यांची राजकीय कोंडी करण्याचा प्रयत्न केला. अडीच वर्षे संघर्ष केल्यानंतर महेश लांडगे यांनी महायुती सरकारच्या माध्यमातून शहराशी संबंधित विविध प्रलंबित प्रश्न मार्गी लावले आहेत. शास्तीकर सरसकट माफी, प्राधिकरण साडेबारा टक्के परतावा, सोसायटीधारकांचा उपयोगकर्ता शुल्क वसुली, प्राधिकरण प्रॉपर्टी फ्री होल्ड, आंद्रा भामा आसखेड पाणी पुरवठा योजना, पवना बंद जलवाहिनी प्रकल्पावरील जैसे थे आदेश उठवण्याचा निर्णय यासह महाराष्ट्रातील शेतकऱ्यांचा जिव्हाळ्याचा विषय असलेला बैलगाडा शर्यत बंदी उठवण्याचा लढा आमदार महेश लांडगे यांनी राज्याचे नेते देवेंद्र फडणवीस यांच्या माध्यमातून यशस्वी केला आहे.

### महेश लांडगे यांच्याकडे विकासाचे ‘व्हीजन’

पिंपरी-चिंचवड शहराच्या शाश्वत विकासाच्या दृष्टीने महेश लांडगे काम करीत आहेत. लोकसभा निवडणुकीनंतर महाविकास आघाडीच्या नेत्यांनी महेश लांडगे भाजपाचा तगडा नेता म्हणून पिंपरी-चिंचवडमध्ये त्यांना घेरण्याचा प्रयत्न केला. धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज यांचा पुतळा ‘स्टॅच्यू ऑफ हिंदुभूषण’, जगद् गुरू संत तुकाराम महाराज संतपीठ, संविधान भवन अशा महत्त्वाकांक्षी प्रकल्पावरुन लांडगे यांच्यावर प्रचंड आरोप झाले. मात्र, एकही आरोप सिद्ध करता आला नाही. याउलट, स्पोर्ट्स सिटी, एज्युकेशन हब, शाश्वत विकास अशा मुद्यांवर महेश लांडगे यांनी निवडणूक लढवली. आयआयएम कॅम्पस, स्वतंत्री पोलीस आयुक्तालय, पिंपरी-चिंचवड न्यायालयाची इमारत, मोशी हॉस्पिटल अशी विकासकामे सुरू केली. त्यामुळे महेश लांडगे यांच्याकडे विकासाचे व्हीजन आहे. त्यांना संधी मिळाली पाहिजे, अशी अपेक्षा सर्वसमान्य पिंपरी-चिंचवडकरांमधून व्यक्त होत आहे.

### हिंदूत्वाचा विचार सोडला नाही...

विधानसभा निवडणूक अत्यंत चुरशीची होणार अशी स्थिती होती. हिंदुत्वाच्या मुद्यावर महाविकास आघाडीने महेश लांडगे यांना प्रचंड ‘ट्रोल’ केले. संविधान भवन आणि संतपीठावरुन राजकारणही झाले. त्यामुळे अल्पसंख्याक आणि मुस्लिम समाजाची मते महेश लांडगे यांच्यापासून दुरावणार असे चित्र होते. त्यामुळे महाविकास आघाडीचे मनोबल वाढले होते. मात्र, महेश लांडगे यांनी शेवटपर्यंत हिंदुत्वाचा मुद्दा सोडला नाही. उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उत्तरप्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांची झांझावाती सभा झाली. महेश लांडगे यांनी प्रखर हिंदूत्ववादी विचार आणि विकासाच्या मुद्यांवर निवडणूक खेचून आणली. त्यामुळे देव-देश अन् धर्माभिमानासह विकासाचा अजेंडा राबवणारा नेते आणि सलग तीनवेळा विधानसभेत विजय खेचून आणणारा आमदार म्हणून महेश लांडगे यांना ‘मेरिट’च्या आधारे कॅबिनेट मंत्रीमंडळामध्ये संधी मिळेल, असा दावा केला जातो आहे.

---

## एकादशीनिमित्त हजारो भाविक आळंदीत दाखल!

## संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर माउलींचा संजीवन समाधी सोहळा

।पुणे ।महाईन्यूज । प्रतिनिधी।

**टाळ-मृदंगाचा टिपेला पोहोचलेला भक्तिकल्लोळ.., माउली- माउली असा अखंड जयघोष.. वैष्णवांच्या मेळ्याने बहरून आलेला इंद्रायणीचा काठ..माउलींच्या दर्शनासाठी लागलेल्या लांबच लांब रांगा.. अशा वातावरणाने सोमवारी (दि.२५) अलंकापुरी दुमदुमून गेली होती. संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर महाराजांच्या संजीवन समाधी सोहळ्यात मंगळवारी एकादशी असल्याने त्याच्या पूर्वसंध्येला मराठवाडा, विदर्भ, खानदेश, पश्चिम महाराष्ट्र, कोकणातून आळंदीमध्ये दिंड्या दाखल झाल्या आहेत.**





संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर माउलींच्या संजीवन समाधी सोहळा कार्तिकीवारीत मंगळवारी (दि.२६) आलेल्या कार्तिकी एकादशीच्या भक्ती पर्वणीचा योग साधण्यासाठी सोमवारी मोठ्या संख्येने भाविक आळंदीत दाखल झाले. इंद्रायणी घाटावर त्यांनी फुगडीचा फेर धरला तर काहींनी टाळ मृदूंगाच्या गजरात देहभान विसरून नाचण्याचा आनंद लुटला. पहाटेपासूनच वारकऱ्यांच्या राहुट्या व धर्मशाळांमधून अभंगाच्या सुरावटी निघू लागल्या आहेत. टाळ- मृदंगाचा गजराने आसमंत भरून गेला असून स्नानासाठी इंद्रायणीच्या तीरावर वारकऱ्यांची गर्दी होऊ लागली आहे. कार्तिकीसाठी इंद्रायणीला पाणी सोडण्यात आले आहे. यामुळे पाण्याप्रमाणे भाविकांची भक्तीही जणू दुथडी भरून वाहत होती.

### जिल्हा प्रशासनाकडून सोयी-सुविधा..

दुसरीकडे माउलींच्या मंदिरामध्ये पहाटेपासून विविध धार्मिक विधीला सुरुवात झाली होती. स्नानानंतर माउलींच्या समाधीचे दर्शन घेण्यासाठी दर्शनबारी पूर्णपणे भरून गेली होती. यंदाच्या सोहळ्यासाठी हजारो वारकरी आळंदीत दाखल झाले आहेत. त्यांच्यासाठी आळंदी पालिका व जिल्हा प्रशासनाकडून विविध सोई-सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत.

### कार्तिकी एकादशीनिमित्त होणारे कार्यक्रम..

पहाटे १.०० वाजता : ११ ब्रम्हवृंदांच्या वेदघोषात पवमान अभिषेक व दुधारती
दुपारी १२ ते १२.३० वाजता : महानैवद्य
दुपारी १.०० वाजता : श्रींची नगरप्रदक्षिणा
रात्री ८.३० : धुपारती
रात्री १२ ते २ : श्री. मोझे यांच्यातर्फे जागर.




# निकालाबद्दलचे सात मुद्दे...

**"संघ'शक्तीचा विजय' (२४ नोव्हेंबर) हे संपादकीय वाचले आणि विश्लेषण पटले, परंतु महायुती लोकसभेच्या अपयशाचा वचपा सुतासहित भरून काढेल असे निकालापूर्वी मात्र वाटले नव्हते. असो यश हे यशच असते आणि मेहनत करून मिळाले की त्याची गोडी अजून वाढते. हे यश म्हणजे महायुतीची मेहनत आणि विरोधकांना लोकसभेच्या यशाच्या धुंदीतून बाहेर यायला लागलेला वेळ.**

राष्ट्रीय स्वयंसेवक संघ सक्रिय असणे किती महत्त्वाचे आहे हे राज्यातील भाजपनेत्यांना पटल्याने महाराष्ट्रातील विधानसभेच्या यशासाठी त्यांचे मन वळवण्यासाठी घेतलेली मेहनत आणि त्यानंतर संघाने केलेले काम. (३) लाडक्या बहिणींनी भावांना सत्तेत यायला चांगलीच मदत केली आहे याबद्दल शंका नाही. फक्त त्यासाठी तिजोरीत झालेली घट आणि अजून होत राहणारी घट कशी भरून काढायची आहे त्याकडे लक्ष देणे गरजेचे आहे. (४) ओबीसींना वळविण्याची धूर्त खेळी खूपच मदतीची ठरली आहे. (५) विरोधक जनतेला स्वत:चे महत्त्व पटवून देण्यास कमी पडल्याने आणि आपापसातील मतभेद टाळू न शकल्याने आणि ते मतभेद जनतेसमोर जाहीरपणे आल्याने, ते काही करू शकतील यावरचा जनतेचा विश्वास उडाला असावा (६) त्यामुळे शरद पवार साहेबांनी तरुणांनाही लाजवेल अशा केलेल्या



प्रचाराचे म्हणावे तेवढे चीज झाले नाही. (७) अदानी आणि धारावी हे मुद्दे महाविकास आघाडीला यश देण्यास कमी पडले. आता अदानीचे हात अमेरिकेने धरण्याचे ठरविले आहेच त्यामुळे त्यांचे जे व्हायचे ते होईल!"संघ'शक्तीचा विजय' हा अग्रलेख (२४ नोव्हेंबर) वाचला. या निकालातून भाजपने विरोधकांना तर चारही मुंड्या चीत केलेच पण त्याच वेळी महायुतीतील मित्रांवरही वचक बसवला. त्याची कारणमीमांसा करताना महायुतीच्या बाजूचे तीन घटक स्पष्टपणे दिसतात : लाडकी बहीण योजनेतून प्रत्यक्ष आर्थिक मदत, अल्पसंख्याकांच्या धोक्याचा काल्पनिक बागुलबुवा (व त्यासाठी समाजमाध्यमांचा हुशारीने केलेला वापर) आणि रा. स्व. संघाची सक्रिय मदत. पहिल्या दोन घटकांतून अनुक्रमे गरीब व मध्यमवर्गीयांवर प्रभाव पाडण्यात भाजप प्रचारकांना यश आले. या तिन्ही घटकांसमोर महाविकास आघाडी निरुत्तर झाली. उलट आघाडीतील अकाली प्रकटलेले हेवेदावे, काँग्रेसचे निष्प्रभ नेतृत्व, 'संविधान बचाव'ची राज्यातील निरर्थकता, गद्दारीबद्दलची उद्धव ठाकरे यांची नैतिक व भावनिक तक्रार आणि भावी आश्वासने यांऐवजी खात्यांत प्रत्यक्ष जमा झालेले रोख पैसे व ते देणारे मतदारांनी लक्षात ठेवले आणि 'अधिकस्य अधिकं फलंह्ल या आशेने मतदानाला भरभरून प्रतिसाद दिला. शिरस्त्याप्रमाणे, काँग्रेसने त्यांच्या जिंकण्याबाबतच्या 'अतर्क्य निरीच्छेचा' प्रत्यय देत आणखी एका संभाव्य विजयाचे अभूतपूर्व पराभवात रूपांतर करून दाखवले. महागाई, बेरोजगारी व तोट्यातील शेती या राज्यापुढील मूळ प्रश्नांबाबत दोन्ही बाजूंकडे सांगण्यासारखे काही नव्हते हेही लक्षणीय. एकूण, ही लढत संघटित व प्रत्यक्ष आर्थिक मदत करणारे विरुद्ध अंतर्कलहग्रस्त व भविष्यातील आश्वासने देणारे यांच्यात झाली व याचा अटळ परिणाम निकालात दिसला. लोकसभेच्या वेळचा एकोपा अधिक घट्ट करून जिवाचे रान करण्याऐवजी महाविकास आघाडीने लाडक्या बहिणीशेजारी महालक्ष्मी उभी करण्याचा बालिशपणा केला. महिलांच्या शिक्षण, आरोग्य, संरक्षण आणि रोजगाराचे प्रश्न अधिक आक्रमकपणे मांडणे हाच लाडक्या बहिणीसाठी योग्य प्रतिसाद होता. भले त्यामुळे विधानसभा जिंकता आली असतीच असे नाही पण एवढी दुर्दशा झाली नसती. असो. फुले-शाहू-आंबेडकरांच्या नावाने राजकारण आधीही प्रतीकात्मकच होते. पुरोगामी आणि प्रतिगामी या विभागणीशी नव्या पिढीला काही देणे-घेणे नाही. या पार्श्वभूमीवर आज, महाविकास आघाडी पुन्हा उभारी घेऊन महाराष्ट्राचे अटळ भगवेकरण थांबवू शकेल काय? एवढीच चिंता उरली आहे. पालिका निवडणुका ही त्यांच्यासाठी शेवटची संधी असणार आहे. आत्मसंतुष्टतेचा आणि निष्क्रियतेचा पराभव होणारच होता तो झाला. त्यामुळे कुणालाही वाईट वाटण्याचे कारण नाही. तरीही संवेदनशील जाणकारांना शरद पवारांबद्दल सहानुभूती वाटणे साहजिक आहे.

## प्रासंगिक »

### महायुतीचे वर्चस्व

***देशाची आर्थिक राजधानी अशी ओळख असलेल्या मुंबईमध्ये शिवसेनेचा दबदबा होता. मात्र मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी बंडाचा झेंडा फडकावला आणि शिवसेनेची दोन शकले झाली.***

एकनाथ शिंदे यांना पाठिंबा देत ३९ आमदारांनी उद्धव ठाकरे यांची साथ सोडली. मात्र उरलेल्या शिलेदारांना सोबत घेऊन उद्धव ठाकरे खिंड लढवत राहिले. लोकसभेच्या नुकत्याच पार पडलेल्या निवडणुकीत महाविकास आघाडीच्या पारड्यात मतदारांनी भरभरून मते टाकली, परंतु विधानसभा निवडणुकीत हे यश महाविकास आघाडीला टिकवता आले नाही. महायुतीने जाहीर केलेल्या लाडकी बहीणसारख्या योजना आणि प्रचारादरम्यान केलेल्या बटेंगे तो कटेंगे, एक हैं, तो सेफ हैं या घोषणा समाजमनावर परिणाम करून गेले.मुंबईतील ३६ पैकी २२ जागा जिंकून महायुतीने निर्विवाद यश प्राप्त केले. महाविकास आघाडीला १४ जागा मिळाल्या आहेत.जागतिक पातळीवर मानाचे स्थान असलेल्या मुंबईमध्ये आजघडीला अनेक समस्या भेडसावत आहेत.

नुकत्याच पार पडलेल्या अमेरिकेच्या निवडणूकीवरून आपल्यापैकी बऱ्याच जणांना हा प्रश्न पडतो की जगभरातल्या घडामोडी, मग ती निवडणूक असू दे नाही तर आंतरदेशीय व्यापार, युद्ध असू दे या आणियासारख्या अनेक बाबींशी आपला संबंध काय हे या लेखामधून जाणून घेऊ.

# ट्रम्प यांच्यामुळे भारतीय लोकांचा खिसा हलका होणार?

विसावे शतक हे जसे औद्योगिकरणाचे शतक म्हणून ओळखले जाते तसेच ते जागतिकारणारचे शतकसुद्धा आहे. ज्याच्यामुळे देश, देशांच्या अर्थव्यवस्था आणि लोक जवळ आले आणि देश एकमेकांशी आधीपेक्षा जास्त जोडले गेले. उदारहरणार्थ, आज सिंगापुर मध्ये बनवली गेलेली गोष्ट भारतामध्ये जास्त सोप्या प्रकारे आणि प्रमाणात मिळू शकते. बरेच लोक नोकऱ्यांसाठी, विद्यार्थी शिक्षणासाठी दुसऱ्या देशांमध्ये तात्पुरते किंवा कायमचे स्थायिक होताना आपण पाहतो हासुद्धा वाढत्या जागतिकीकरणाचा आपल्या वैयक्तिक आयुष्यवर पडणारा परिणाम आहे.सर्वात प्रथम, जागतिक घडामोडींचा परिणाम हा आपल्याला देश पातळीवर दिसून येतो. उदाहरणार्थ, अमेरिकेची २०२४ मधील निवडणूक ज्यात डोनाल्ड ट्रम्प हे नवीन राष्ट्राध्यक्ष म्हणून निवडून आले याचा भारतीय अर्थव्यवस्थेवर विविध रूपात परिणाम आपल्याला पाहायला मिळतोय आणि पुढेही दिसेल. पहिला



झालेला प्रभाव रुपयाच्या किमतीवर दिसून आला. एका अमेरिकन डॉलरची किंमत ही ८४ रुपयांवर घसरली. वरकरणी पाहता जरी ही गोष्ट चांगली वाटत नसली तरी अर्थशास्त्र सांगते की चलनाचे भाव कमी झाले की निर्यात स्वस्त होते आणि म्हणून वाढते आणि निर्यातीचे हे प्रमाण समाधानकाररीत्या वाढत गेले तर, देशात परकीय चलनाची आयात वाढून ती देशाच्या प्रगतीचा दर वाढवायला कारणीभूत ठरते. आता हे बदल भारतीय निर्यातीच्या बाबतीत होतात का हे पुढील काही महिन्यामध्ये दिसून येईल. असे झाले तर भारतीय निर्यातदार आणि व्यावसायिकांना याचा फायदा होईल आणि नाही झाले तर नुकसान होईल.दुसरा परिणाम हा भारतीय शेअर बाजार घासाऱ्यातून दिसून आला आणि याला कारण परदेशी गुंतकवणूकदारानी जे ४,४४५.५९ कोटी रुपयांचे समभाग विकून, पैसे शेअर बाजारामधून काढून घेतले हेच आहे. त्यांच्या अपेक्षेनुसार ट्रम्प हे राष्ट्राध्यक्ष झाल्यामुळे अमेरिकेमध्ये व्यवसाय वाढीसाठी पूरक धोरणे आणि कायदे येतील, ज्याचा फायदा त्यांना होईल. सगळ्यात जास्त घसरण फार्मास्युटिकल उद्योग आणि आयटी सेवा कंपन्यांच्या समभागांची झाली, याउलट भारतीय सार्वजनिक बँकांचे शेअर मात्र सुस्थित दिसले. हे असेच चालत राहिले तर, भारतीय शेअर बाजारातील परकीय गुंतवणुकीची आवक कमी होऊ शकते. मात्र स्ट्राँग डॉलर आणि आकर्षक वाटणारा अमेरिकन समभाग बाजार यांमधूनही, जर अमेरिकेच्या मध्यवर्ती बँकेने महागाई ताब्यात ठेवण्यासाठी जी व्याजदर कपात सांगितले आहेत तसेच येत्या काही महिन्यांत केले आणि परिणामी गुंतवणुकीवरील परतावा कमी होताना दिसून आला.

## ।। अभंगवाणी ।।



आजिवरी तुम्हां आम्हां नेणपण ।
कौतुकें खेळणें संग होता ॥१॥

आतां अनावर जालें अगुणाची ।
करूं नये तें चि करीं सुखें ॥२॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे- पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे- 411018 येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
**कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव । मुख्य कार्यकारी संपादक : सुनील आढाव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) विशेष सूचना: हा अंक कोणत्याची प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

# शहा करणार आज मुख्यमंत्रीपदाची घोषणा!

## मुख्यमंत्री एकनाथ शिंदे मुख्यमंत्रिपदासाठी प्रचंड आग्रही

। नवी दिल्ली ।
वृत्तसंस्था : महाईन्यूज



**विधानसभा निवडणुकीतील नेत्रदीपक विजयानंतर आता महायुतीत सत्तेतील वाट्यावरुन रस्सीखेच सुरु आहे. तब्बल १३२ जागा जिंकणारा भाजप मुख्यमंत्रीपद सोडण्यास तयार नाही. तर अडीच वर्षांपासून मुख्यमंत्री एकनाथ शिंदे मुख्यमंत्रिपदासाठी प्रचंड आग्रही आहेत. त्यामुळे सरकार स्थापनेचा तिढा कायम आहे. तो सोडवण्यासाठी केंद्रीय गृहमंत्री अमित शहा उद्या मुंबईत येणार आहेत. ते निरीक्षक म्हणून मुंबईत येत आहेत. अमित शहाच मुख्यमंत्रिपदाबद्दल घोषणा करतील. मंत्रिपदांच्या वाटपाचा विषयदेखील शहाच मार्गी लावणार आहेत.**

भाजपनं १४८ जागा लढवत १३२ जागांवर विजय मिळवला. तर शिवसेनेनं ८० जागा लढवून ५७ जागा जिंकली. एकनाथ शिंदे मुख्यमंत्रिपदासाठी बरेच आग्रही आहेत. आपणच मुख्यमंत्री राहिल्यास त्याचा महायुतीला कसा फायदा होईल, हे पटवून देण्याचा प्रयत्न त्यांच्याकडून सुरु आहे. त्यासाठी ते भाजप नेतृत्वाशी वाटाघाटी करत आहेत. तर दुसरीकडे उपमुख्यमंत्री अजित पवारांनी भाजपचा मुख्यमंत्री व्हावा म्हणत आपलं वजन देवेंद्र फडणवीसांच्या पारड्यात टाकलं आहे. या सगळ्या पार्श्वभूमीवर अमित शहा उद्या मुंबईत येत आहेत. भाजपमधील सुत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, सध्या तीन फॉर्म्युल्यांच्या आधारे मुख्यमंत्रिपदाचा चेहरा ठरू शकतो. महायुतीमधील मित्रपक्षांना सत्तेत वाटा देण्यासाठी भाजप नव्या सरकारमध्ये दोघांना उपमुख्यमंत्रिपद देईल. त्यामुळे राजस्थानमध्ये भाजपनं वापरलेला फॉर्म्युला चर्चेत आहे. तिकडे भाजप नेतृत्वानं भजनलाल शर्मा यांना मुख्यमंत्रिपद दिलं. शर्मा पहिल्यांदाच आमदार झाले होते. त्यांना थेट मुख्यमंत्री करण्यात आलं. तशाच प्रकारे भाजप एका नव्या चेहऱ्याला संधी देऊ शकतो. भाजपला महाराष्ट्रात मध्य प्रदेशप्रमाणेच तीन चतुर्थांश बहुमत मिळालं आहे. मध्य प्रदेशात भाजपनं मुख्यमंत्री शिवराजसिंह चौहान यांना हटवून मोहन यादव यांच्याकडे धुरा सोपवली. यादव त्याआधी सिंह यांच्या मंत्रिमंडळात कॅबिनेट मंत्री होते. त्याच प्रकारे एखाद्या कॅबिनेट मंत्र्याला मुख्यमंत्रिपदी बढती मिळू शकते. तिसरा फॉर्म्युला बिहारचा आहे. बिहारमध्ये २०२० मध्ये एनडीएला बहुमत मिळालं. निकालात मुख्यमंत्री नितीश कुमार यांचा पक्ष तिसऱ्या क्रमांकावर राहिला. त्यांचे ४३ उमेदवार निवडून आले. पण भाजपनं कुमार यांना दिलेलं आश्वासन पाळलं आणि त्यांना मुख्यमंत्री केलं. राज्यात महायुती शिंदेंच्या नेतृत्वात विधानसभा लढली आहे. त्यामुळे बिहार पॅटर्नच्या आधारे शिंदेच पुन्हा एकदा मुख्यमंत्री होऊ शकतात. भाजपनं १४८ जागा लढवत १३२ जागांवर विजय मिळवला. तर शिवसेनेनं ८० जागा लढवून ५७ जागा जिंकली. एकनाथ शिंदे मुख्यमंत्रिपदासाठी बरेच आग्रही आहेत. आपणच मुख्यमंत्री राहिल्यास त्याचा महायुतीला कसा फायदा होईल, हे पटवून देण्याचा प्रयत्न त्यांच्याकडून सुरु

आहे. त्यासाठी ते भाजप नेतृत्वाशी वाटाघाटी करत आहेत. तर दुसरीकडे उपमुख्यमंत्री अजित पवारांनी भाजपचा मुख्यमंत्री व्हावा म्हणत आपलं वजन देवेंद्र फडणवीसांच्या पारड्यात टाकलं आहे. या सगळ्या पार्श्वभूमीवर अमित शहा उद्या मुंबईत येत आहेत. भाजपमधील सुत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, सध्या तीन फॉर्म्युल्यांच्या आधारे मुख्यमंत्रिपदाचा चेहरा ठरू शकतो. महायुतीमधील मित्रपक्षांना सत्तेत वाटा देण्यासाठी भाजप नव्या सरकारमध्ये दोघांना उपमुख्यमंत्रिपद देईल. त्यामुळे राजस्थानमध्ये भाजपनं वापरलेला फॉर्म्युला चर्चेत आहे. तिकडे भाजप नेतृत्वानं भजनलाल शर्मा यांना मुख्यमंत्रिपद दिलं. शर्मा पहिल्यांदाच आमदार झाले होते. त्यांना थेट मुख्यमंत्री करण्यात आलं. तशाच प्रकारे भाजप एका नव्या चेहऱ्याला संधी देऊ शकतो. भाजपला महाराष्ट्रात मध्य प्रदेशप्रमाणेच तीन चतुर्थांश बहुमत मिळालं आहे. मध्य प्रदेशात भाजपनं मुख्यमंत्री शिवराजसिंह चौहान यांना हटवून मोहन यादव यांच्याकडे धुरा सोपवली. यादव त्याआधी सिंह यांच्या मंत्रिमंडळात कॅबिनेट मंत्री होते. त्याच प्रकारे एखाद्या कॅबिनेट मंत्र्याला मुख्यमंत्रिपदी बढती मिळू शकते. तिसरा फॉर्म्युला बिहारचा आहे. बिहारमध्ये २०२० मध्ये एनडीएला बहुमत मिळालं. निकालात मुख्यमंत्री नितीश कुमार यांचा पक्ष तिसऱ्या क्रमांकावर राहिला.

### कॅबिनेट मंत्र्याला मुख्यमंत्रिपदी बढती

त्यांचे ४३ उमेदवार निवडून आले. पण भाजपनं कुमार यांना दिलेलं आश्वासन पाळलं आणि त्यांना मुख्यमंत्री केलं. राज्यात महायुती शिंदेंच्या नेतृत्वात विधानसभा लढली आहे. त्यामुळे बिहार पॅटर्नच्या आधारे शिंदेच पुन्हा एकदा मुख्यमंत्री होऊ शकतात.विधानसभा निवडणुकीतील नेत्रदीपक विजयानंतर आता महायुतीत सत्तेतील वाट्यावरुन रस्सीखेच सुरु आहे. तब्बल १३२ जागा जिंकणारा भाजप मुख्यमंत्रीपद सोडण्यास तयार नाही. तर अडीच वर्षांपासून मुख्यमंत्री एकनाथ शिंदे मुख्यमंत्रिपदासाठी प्रचंड आग्रही आहेत. त्यामुळे सरकार स्थापनेचा तिढा कायम आहे. तो सोडवण्यासाठी केंद्रीय गृहमंत्री अमित शहा उद्या मुंबईत येणार आहेत. ते निरीक्षक म्हणून मुंबईत येत आहेत. अमित शहाच मुख्यमंत्रिपदाबद्दल घोषणा करतील.

# विद्यमान विधानसभेचा शेवटचा दिवस

## अद्याप सत्तास्थापनेचा मुहूर्त नाही; राज्यात राष्ट्रपती राजवट लागणार?

। मुंबई । प्रतिनिधी ।
महाईन्यूज।

**२६ नोव्हेंबर २०१९ रोजी अस्तित्वात आलेल्या १४ व्या विधानसभेची मुदत आज (२६ नोव्हेंबर) संपणार आहे. २३ नोव्हेंबर रोजी स्पष्ट बहुमत मिळाल्यानंतरही महायुतीने अद्याप सत्ता स्थापन केलेली नाही. मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री आणि इतर मंत्रिपदाबाबतच्या चर्चासाठी महायुतीतील नेत्यांची धावपळ सुरू आहे. त्यामुळे विधानसभेची मुदत संपल्यानंतर राज्यात राजकीय स्थिती काय असणार?**

राष्ट्रपती राजवट लागणार का? कोणाच्या हातात असणार सत्तेच्या चाव्या असे असंख्य प्रश्न उपस्थित होत आहेत.२०१९ साली १४ वी विधानसभा अस्तित्वात आल्यापासून या सरकारला अनेक आव्हान पेलावे लागले. उद्धव ठाकरेंच्या नेतृत्वात महाविकास आघाडीचे सरकार स्थापन होताच करोनापर्व सुरू झाले.

त्यामुळे सत्तेची घडी बसवतानाच करोना महामारीचा सामना करावा लागला. करोनाची लाट ओसरत नाही तोवर महायुतीतील घटकपक्ष असलेल्या शिवसेनेत बंड झाले. तत्कालीन नगरविकास मंत्री एकनाथ शिंदे यांनी जवळपास ४० आमदारांना घेऊन महाविकास आघाडीतून काढता पाय काढला. परिणामी तत्कालीन सरकारला बहुमत सिद्ध करता न आल्याने उद्धव ठाकरेंचं सरकार बरखास्त झालं. उद्धव ठाकरेंनी मुख्यमंत्री पदाचा राजीनामा देताच एकनाथ शिंदेंच्या शिवसेनेने भाजपाबरोबर सूत जमवले अन् राज्यात नवं सरकार स्थापन झालं. राजकारणातील या भूकंपामुळे राज्याला नवं समीकरण पाहायला मिळालं.

शिंदे मुख्यमंत्री बनले अन् १०५ आमदार निवडून आलेल्या पक्षातील नेत्याला उपमुख्यमंत्री पदाची जबाबदारी देण्यात आली.




### विधानसभा निवडणुकीत स्पष्ट बहुमत

त्यानंतर वर्षभरातच राष्ट्रवादी काँग्रेस पक्षातही फूट पडली अन् विरोधी बाकावर असलेले अजित पवार थेट सरकारच्या उपमुख्यमंत्री पदी विराजमान झाले. त्यामुळे गेल्या पाच वर्षांत राज्याने बरीच राजकीय उलथा-पालथ पाहिली. पाच वर्षांनंतर पुन्हा विधानसभेच्या निवडणुका झाल्या असून महायुतीला स्पष्ट बहुमत मिळालं आहे.भाजपाला १३२, शिवसेना (एकनाथ शिंदे) पक्षाला ५६ आणि राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) पक्षाला ४० जागा जिंकता आल्या आहेत. त्यामुळे ते सत्तास्थापनेचा दावा करणार असल्याचं स्पष्ट आहे. परंतु, मंत्रिपदाबाबत हालचाली चालू असल्याने त्यांनी अद्यापही सत्तास्थापनेचा दावा केलेला नाही.

# संसद नियंत्रित करण्याचा प्रयत्न!

## मोदींनी विरोधकांना केलं लक्ष्य, अधिवेशनात फलदायी आणि रचनात्मक चर्चा

।नवी दिल्ली।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**संसदेच्या हिवाळी अधिवेशनाला आजपासून सुरुवात झाली असून, त्यापूर्वी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी माध्यमांना संबोधित केले. यावेळी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आशा व्यक्त केली की, या अधिवेशनात फलदायी आणि रचनात्मक चर्चा होईल. यावेळी पंतप्रधान नरेंद्र मोदींनी विरोधकांवर टीका करत, ते संसद विस्कळीत करण्याचा प्रयत्न करत असल्याचा आरोप केला.**



त्यांच्या या कृतींवर जनतेचे बारीक लक्ष आहे. वेळ आल्यावर त्यांना जनता जबाबदार धरेल. २०२४ चा हा शेवटचा काळ आहे, देशही २०२५ चे स्वागत जोशात आणि उत्साहात करण्याच्या तयारीत आहे. संसदेचे हे अधिवेशन अनेक अर्थाने विशेष आहे. सर्वात मोठी गोष्ट म्हणजे आपल्या राज्यघटनेचा ७५ व्या वर्षात प्रवेश होणे ही लोकशाहीसाठी अतिशय उज्ज्वल बाब आहे."यावेळी बोलताना पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी संसदेत सकारात्मक चर्चा घडावी यासाठी आवाहन केले. पंतप्रधान नरेंद्र मोदी पुढे म्हणाले की,"दुर्दैवाने आपल्या राजकीय फायद्यासाठी काही लोक, ज्यांना जनतेने नाकारले आहे, ते संसदेवरही नियंत्रण ठेवण्याचा प्रयत्न करत आहेत. संसदेचे कामकाज थांबवून त्यांचे स्वतःचे उद्दिष्ट साध्य होत नाही. पण, त्यांची अशी कृती पाहून जनता त्यांना नाकारते. जनतेने या लोकांना ८०-९० वेळा नाकारले आहे." नवे खासदार नव्या कल्पनाच नव्हे तर ऊर्जाही घेऊन येतात आणि ते कोणा एका पक्षाचे नसून सर्वच पक्षांचे असतात. पण, काही लोक त्यांचे हक्क दडपतात, ही सगळ्यात क्लेशदायक गोष्ट आहे. त्यांना सभागृहात बोलण्याची संधीही मिळत नाही. लोकशाही परंपरेत येणाऱ्या नव्या पिढ्यांना तयार करणे हे प्रत्येक पिढीचे काम असते, पण ज्यांना जनतेने ८०-८०, ९०-९० वेळा नाकारले ते ना संसदेत चर्चा होऊ देतात, ना लोकशाहीच्या भावनेचा आदर करतात.संसदेचे हिवाळी अधिवेशन आजपासून सुरू झाले. या अधिवेशनात सरकारने वक्फ (दुरुस्ती) विधेयकासह १६ विधेयके सूचीबद्ध केली आहेत. सध्या लोकसभेत आठ आणि राज्यसभेत दोन विधेयके प्रलंबित आहेत. संसदेचे हिवाळी अधिवेशन २५ नोव्हेंबर ते २० डिसेंबरपर्यंत चालणार आहे. या हिवाळी अधिवेशनात मोदी सरकार अनेक महत्त्वाची विधेयके मंजूर करून घेण्यासाठी प्रयत्नशील असणार आहे. त्यामुळे काँग्रेससह अनेक विरोधी पक्ष अनेक महत्त्वाच्या विधेयकांवर आक्षेप घेऊ शकतात. अशा स्थितीत संसदेच्या हिवाळी अधिवेशन गदारोळ होण्याची शक्यता आहे. हिवाळी अधिवेशनाला सुरुवात होण्यापूर्वी सरकारने सर्वपक्षीय बैठक बोलवली होती. या बैठकीत विरोधी पक्षांनी, पहिल्याच दिवशी अदानी यांच्या मुद्द्यावर चर्चा व्हावी अशी मागणी केली होती. दुसरीकडे सरकारने कामकाज सुरळीत चालू देण्याचे आवाहन केले. संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत काँग्रेसचे गौरव गोगोई आणि आपचे संजय सिंह यांनी अदाणी समूहावरील आरोप आणि भ्रष्टाचारप्रकरणी अमेरिकेत दाखल झालेला खटला अत्यंत गंभीर असल्याचे म्हटले आहे. यावेळी बोलताना पंतप्रधान मोदी म्हणाले, "विरोधक संसद विस्कळीत करण्याचा प्रयत्न करत आहेत. त्यांच्या या कृतींवर जनतेचे बारीक लक्ष आहे. वेळ आल्यावर त्यांना जनता जबाबदार धरेल. २०२४ चा हा शेवटचा काळ आहे, देशही २०२५ चे स्वागत जोशात आणि उत्साहात करण्याच्या तयारीत आहे. संसदेचे हे अधिवेशन अनेक अर्थाने विशेष आहे. सर्वात मोठी गोष्ट म्हणजे आपल्या राज्यघटनेचा ७५ व्या वर्षात प्रवेश होणे ही लोकशाहीसाठी अतिशय उज्ज्वल बाब आहे."यावेळी बोलताना पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी संसदेत सकारात्मक चर्चा घडावी यासाठी आवाहन केले. पंतप्रधान नरेंद्र मोदी पुढे म्हणाले की,"दुर्दैवाने आपल्या राजकीय फायद्यासाठी काही लोक, ज्यांना जनतेने नाकारले आहे, ते संसदेवरही नियंत्रण ठेवण्याचा प्रयत्न करत आहेत.

### बोलण्याची संधीही मिळत नाही

. संसदेचे कामकाज थांबवून त्यांचे स्वतःचे उद्दिष्ट साध्य होत नाही. पण, त्यांची अशी कृती पाहून जनता त्यांना नाकारते. जनतेने या लोकांना ८०-९० वेळा नाकारले आहे." नवे खासदार नव्या कल्पनाच नव्हे तर ऊर्जाही घेऊन येतात आणि ते कोणा एका पक्षाचे नसून सर्वच पक्षांचे असतात. पण, काही लोक त्यांचे हक्क दडपतात, ही सगळ्यात क्लेशदायक गोष्ट आहे. त्यांना सभागृहात बोलण्याची संधीही मिळत नाही. लोकशाही परंपरेत येणाऱ्या नव्या पिढ्यांना तयार करणे हे प्रत्येक पिढीचे काम असते, पण ज्यांना जनतेने ८०-८०, ९०-९० वेळा नाकारले ते ना संसदेत चर्चा होऊ देतात, ना लोकशाहीच्या भावनेचा आदर करतात.संसदेचे हिवाळी अधिवेशन आजपासून सुरू झाले. या अधिवेशनात सरकारने वक्फ (दुरुस्ती) विधेयकासह १६ विधेयके सूचीबद्ध केली आहेत.

# इम्रान खान यांच्या सुटकेसाठी आंदोलन!

## राजधानीकडे निघालेल्या समर्थकांना रोखण्यासाठी अश्रुधुर

।नवी दिल्ली।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**पाकिस्तानमध्ये तुरुंगात बंद असलेले माजी पंतप्रधान इम्रान खान यांच्या सुटकेसाठी त्यांच्या समर्थकांकडून जोरदार निदर्शने केली जात आहेत. तेहरिक-ए-इन्साफ (पीटीआय) च्या आवाहनानंतर देशभरातून पक्ष समर्थकांचे ताफे शक्ती प्रदर्शन करत राजधानी इस्लामाबादकडे कूच करत आहेत. सरकारकडून मात्र पीटीआयच्या कार्यकर्त्यांना अटक केली जात आहे.**



याबरोबरच त्यांना इस्लामाबादकडे येण्यापासून रोखण्याकरिता अश्रुधूर तसेच बळाचा वापरदेखील करण्यात येत आहे.इस्लामाबादकडे निघालेल्या तेहरिक-ए-इन्साफ (पीटीआय) पक्षाच्या कार्यकर्त्यांना सरकारी यंत्रणांच्या जोरदार विरोधाला सामोरे जावे लागत आहे. पाकिस्तानमधील खैबर-पख्तूनख्वाचे मुख्यमंत्री अली अमीन गंडापूर आणि विरोधी पक्षनेते उमर अयुब यांच्या नेतृत्वाखालील पीटीआय समर्थकांचा मोठा ताफा पंजाबमार्गे स्वाबीहून इस्लामाबादला जात होता. या ताफ्यातील पीटीआय समर्थकांना पांगवण्यासाठी मोठ्या प्रमाणात अश्रुधुराच्या नळकांड्यांचा वापर करण्यात आला. अट्टोक ब्रिज, चाच इंटरचेंज आणि गाझी बरोथा कॅनॉल या भागात हा प्रकार घडला. याबद्दल एक्सप्रेस ट्रिब्यूनने वृत्त दिले आहे.स्वाब येथून निघालेल्या पीटीआय समर्थकांच्या ताफ्याचा प्रवास ते पंजाब प्रांतात प्रवेशकरेपर्यंत सुरळीत सुरू होता. मात्र पुढे त्यांना सरकारी यंत्रणांच्या विरोधाला सामोरे जावे लागले.

### इस्लामाबादमध्ये होणार आंदोलन

यावेळी गंडापूर यांना पक्षाच्या समर्थकांना संबोधित केले. जोपर्यंत पीटीआयचे नेते इम्रान खान यांची सुटका होत नाही, तोपर्यंत आपला मोर्चा माघारी फिरवणार नसल्याचे गंडापूर यांनी यावेळी जाहीर केले. पक्षाअंतर्गत मतभेद समोर आल्याचे पाहायला मिळाले. येथे गंडापूर यांनी पुढील संघर्षाच्या आधीकार्यकर्त्यांना काहीवेळ आराम करण्याचा सल्ला दिला. तर दुसरीकडे इम्रान खान यांच्या पत्नी बुशरा बीबी यांनी मात्र होत असलेल्या उशीराबद्दल नाराजी व्यक्त करत विनाकारण वेळ वाया घालवला जात असल्याचे तक्रार केली.

# 'तेरी बातों में ऐसा उलझा जिया'



शाहीद कपूर आणि क्रिती सेनॉन यांच्या मुख्य भूमिका असलेला 'तेरी बातों में ऐसा उलझा जिया' हा चित्रपट शुक्रवारी प्रेक्षकांच्या भेटीला आला. या चित्रपटाला प्रेक्षकांचा चांगला प्रतिसाद मिळतोय. हा रोमँटिक ड्रामा चित्रपट पाहण्यासाठी प्रेक्षकांची गर्दी पाहायला मिळत आहे. या चित्रपटात एका मराठी अभिनेत्रीने काम केलं आहे. तिने स्वतः याबद्दल पोस्ट शेअर करून माहिती दिली आहे.'चला हवा येऊ द्या' फेम स्नेहल शिदम 'तेरी बातों में ऐसा उलझा जिया' या चित्रपटात झळकली आहे. तिने शाहीद कपूरबरोबर स्क्रीन शेअर केली आहे. चित्रपटात तिचे शाहीदबरोबर सीन आहेत. "कळवायला उशीर आणि आनंद दोन्ही होतोय. शाहीद कपूर आणि क्रिती सेनॉन यांचा नवीन हिंदी सिनेमा "तेरी बातो में ऐसा उलझा जिया" नुकताच प्रदर्शित झाला आहे. यात माझी एक छोटीशी भूमिका आहे. तुमच्या जवळच्या चित्रपटगृहात जाऊन सिनेमा नक्की बघा आणि कसा वाटतोय ते सांगा. तुमचं प्रेम आणि आशीर्वाद असेच राहुद्या," असं स्नेहलने इन्स्टाग्रामवर शाहीदबरोबरचा फोटो शेअर करत लिहिलं आहे.'तेरी बातों में ऐसा उलझा जिया' हा चित्रपट पाहणाऱ्या अनेक प्रेक्षकांना मराठमोळ्या स्नेहल शिदमला पडद्यावर पाहून आश्चर्याचा धक्का बसला आहे. अनेकांनी सोशल मीडियावर स्नेहलचे व्हिडीओ शेअर केले आहेत. स्नेहलचा हा पहिलाच चित्रपट आहे. पहिल्याच चित्रपटात शाहीद कपूरबरोबर स्क्रीन शेअर करणाऱ्या स्नेहलचं चाहते खूप कौतुक करत आहेत. तिने शेअर केलेल्या पोस्टवर कमेंट करून तिला चाहते व अभिनयक्षेत्रातील लोक शुभेच्छा देत आहेत.

# आमिरच्या चित्रपटात झळकणार जिनिलीया

आमिर खानच्या 'लाल सिंग चड्ढा' या चित्रपटाने बॉक्स ऑफिसवर अत्यंत निराशजनक कामगिरी केली होती. खरंतर, आमिरला बॉलीवूडचा मिस्टर परफेक्शनिस्ट म्हणून ओळखलं जातं. त्यामुळे अशा दमदार अभिनेत्याचे सलग चित्रपट फ्लॉप होणं हे आमिरसह त्याच्या चाहत्यांसाठी धक्कादायक होतं. 'लाल सिंग चड्ढा' फ्लॉप झाल्यावर त्याने अभिनयातून काही काळ ब्रेक घ्यायचं ठरवलं. परंतु, आता लवकरच आमिर पुन्हा एकदा प्रेक्षकांसह चाहत्यांचं मनोरंजन करण्यासाठी मोठ्या पडद्यावर पुनरागमन करणार आहे.आमिर बहुचर्चित 'सितारे जमीन पर' चित्रपटातून पुन्हा एकदा प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. हा चित्रपट 'कॅम्पिओन्स'चा हिंदी रिमेक असणार आहे. या चित्रपटासाठी आमिरने सर्वात आधी फरहान अख्तरला नायकाच्या भूमिकेसाठी ऑफर दिली होती पण, त्यानंतर अभिनेत्याने ही भूमिका स्वतः साकारण्याचा निर्णय घेतला. 'सितारे जमीन पर'चं दिग्दर्शन आरएस प्रसन्ना यांनी केलं आहे. आता या चित्रपटात झळकणाऱ्या नायिकेचं नावंही समोर आलं आहे.पिंकव्हिलाने दिलेल्या रिपोर्टनुसार, अभिनेत्री जिनिलीया देशमुखने आमिर खानचा आगामी चित्रपट 'सितारे जमीन पर' साइन केला आहे. याशिवाय अभिनेत्रीने यासंदर्भात माहिती देणारी एक इन्स्टाग्राम स्टोरी देखील शेअर केली आहे. या स्टोरीमध्ये आमिर खानच्या प्रोडक्शन हाऊसची बॉटल पाहायला मिळत आहे. या फोटोला जिनिलीयाने "१६ वर्षांनंतर..." असं कॅप्शन दिलं आहे. यापूर्वी अभिनेत्रीने आमिरची निर्मिती असलेल्या 'जाने तू या जाने ना' चित्रपटासाठी काम केलं होतं. यामध्ये अभिनेत्याचा भाचा इम्रान खानने प्रमुख भूमिका साकारली होती.दरम्यान, 'सितारे जमीन पर' चित्रपटात आमिर खान, जिनिलीया देशमुखसह 'तारे जमीन पर' फेम दर्शील प्रमुख भूमिकेत झळकणार आहे. आता आमिर या चित्रपटासंदर्भात पुढील अपडेट्स केव्हा देणार याबाबत त्याच्या चाहत्यांच्या मनात उत्सुकता निर्माण झाली आहे.



# मोठा झाल्यावर तैमूर काय बनणार?

अभिनेता सैफ अली खान आणि करीना कपूरप्रमाणेच त्यांचा मोठा मुलगा तैमूर अली खान नेहमीच चर्चेत असतो. तैमूर लोकप्रिय स्टारकिड्सपैकी एक आहे. सोशल मीडियावर तैमूरचे अनेक फोटो व व्हिडीओ व्हायरल होत असतात. त्याचा एक फोटो घेण्यासाठी पापसाझींमध्ये चढाओढ होताना दिसते. चाहत्यांकडूनही तैमूरच्या फोटोंना मोठ्या प्रमाणात पसंती मिळत असते.तैमूरबाबात छोट्या मोठ्या गोष्टी जाणून घेण्यास चाहते मोठ्या प्रमाणात उत्सुक असतात. मोठा झाल्यावर तैमूर आई-बाबासारखाच अभिनय क्षेत्रात येणार का अनेकदा असा प्रश्न विचारला जातो. दरम्यान एका मुलाखतीत सैफ अली खान व करीनाने याबाबतचा खुलासा केला आहे. सैफ म्हणाला, तैमूला अभिनेता बनण्यात कोणताही रस नाही. त्याला फूटबॉल खेळाडू बनायचे आहे. त्यासाठी त्याला अर्जेटीनाला जायचे आहे. तर करीना म्हणाली, त्याला गिटारिस्टही बनण्याची इच्छा आहे. तसेच त्याला मेस्सीसारखा प्रसिद्ध फूटबॉलपटूही बनायचे आहे.

# धर्मेंद्र यांनी केला नावात बदल

बॉलीवूडमधील ज्येष्ठ अभिनेते म्हणून धर्मेंद्र यांना ओळखले जाते. ७० च्या दशकात त्यांनी अनेक सुपरहिट चित्रपटांमध्ये काम केले. आतापर्यंत त्यांनी तब्बल ३०० चित्रपटांमध्ये वेगवेगळ्या धाटणीच्या भूमिका साकारल्या आहेत. धर्मेंद्र यांचे संपूर्ण नाव धर्मेंद्र सिंह देओल आहे. मात्र, त्यांनी कधीच आपले पूर्ण नाव वापरले नाही. त्यांनी नेहमीच धर्मेंद्र हे पहिलेच नाव सगळीकडे वापरले. मात्र, आता तब्बल ६४ वर्षांनी त्यांनी आपल्या नावामध्ये बदल केला आहे. नुकताच शाहिद कपूर आणि क्रिती सेनॉन यांचा 'तेरी बातों में ऐसा उल्झा जिया' चित्रपट प्रदर्शित झाला.



# 'रामायण' चित्रपटात रकुल शूर्पणखाच्या भूमिकेत

गेल्या काही महिन्यांपासून रामायणावर आधारित 'रामायण' या चित्रपटाची चर्चा सुरू आहे. नितेश तिवारी दिग्दर्शित 'रामायण' या चित्रपटात अभिनेता रणबीर कपूर प्रभू श्रीरामाच्या भूमिकेसाठी निश्चित झाला आहे. तर सीतेच्या भूमिकेसाठी जान्हवी कपूर व दाक्षिणात्य अभिनेत्री साई पल्लवी यांच्या नावाची चर्चा सुरू आहे. पण अजूनपर्यंत सीतेच्या भूमिकेसाठी अभिनेत्री ठरलेली नाही. अशातच शूर्पणखाची भूमिका कोणती बॉलीवूड अभिनेत्री साकारणार हे समोर आलं आहे.नितेश तिवारी दिग्दर्शित 'रामायण' चित्रपटात शूर्पणखाच्या भूमिकेसाठी अभिनेत्री रकुल प्रीत सिंगच्या नावाची चर्चा सुरू आहे. 'पिंकविला'च्या वृत्तानुसार, रकुल प्रीत सिंग शूर्पणखाच्या भूमिकेत पाहायला मिळू शकते. याविषयी चित्रपट निर्मात्यांमध्ये चर्चा झाली आहे. पण निर्मात्यांनी स्वतः याबाबत अधिकृतरित्या घोषणा केली नाहीये. त्यामुळे रकुल प्रीत सिंग शूर्पणखाच्या भूमिकेत पाहायला मिळणार, या अधिकृत घोषणेची चाहते आतुरतेने वाट पाहत आहेत. माहितीनुसार, शूर्पणखा भूमिकेसाठी रकुलची टेस्ट पूर्ण झाली आहे. जर रकुलचं ही भूमिका साकारणार असल्याचं निश्चित झालं तर मग जॅकी भगनानीशी लग्न केल्यानंतरचा 'रामायण' हा तिचा पहिला चित्रपट असेल.दरम्यान, अभिनेत्री रकुल प्रीत सिंग जॅकी भगनानीबरोबर २१ फेब्रुवारीला लग्नबंधनात अडकणार असल्याचं म्हटलं जात आहे. गोव्यात मोठ्या थाटामाटात दोघांचं लग्नसोहळा असणार आहे.

# भारताने विक्रमांची रांगच लावली!

## बुमराहच्या नेतृत्वाखाली देशात केला भीमपराक्रम

नवी दिल्ली ।
। वृत्तसंस्था

**भारतीय संघाने बॉर्डर-गावस्कर ट्रॉफी २०२४-२५ सुरुवात ऐतिहासिक विजयाने केले आहे. पर्थ कसोटीच्या पहिल्या डावात १५० धावांत ऑल आऊट झाल्यानंतर भारताने या सामन्यात अप्रतिम पुनरागमन केलं. १५० वर सर्वबाद झाल्यानंतर ऑस्ट्रेलियाला भारताने २९५ धावांनी पराभूत करत मोठा ऐतिहासिक विजय नोंदवला आहे.**



भारताची पहिल्या डावातील स्थिती पाहता टीम इंडिया या सामन्यात पुनरागमन करेल अशी आशा कोणालाच नव्हती. पण जसप्रीत बुमराहच्या नेतृत्वाखालील संघाने पर्थमध्ये आश्चर्यकारक कामगिरी केली. रोहित शर्माच्या अनुपस्थितीत कर्णधार असलेल्या बुमराहने संघाचे नेतृत्त्व करत ८ विकेट्स घेत भारताच्या विजयात मोठी भूमिका बजावली. इतर गोलंदाजांनीही बुमराहला चांगली साथ दिली. तर दुसऱ्या डावात भारताच्या यशस्वी जैस्वाल, केएल राहुल आणि विराट कोहली यांनी उत्कृष्ट फलंदाजी करत भारताच्या विजयाचा पाया रचला. भारताच्या ऑस्ट्रेलियावरील पर्थ कसोटीतील विजयासह SENA देशांमध्ये (दक्षिण आफ्रिका, इंग्लंड, न्यूझीलंड आणि ऑस्ट्रेलिया) धावांच्या बाबतीत कसोटी क्रिकेटमध्ये सर्वात मोठा विजय मिळवला. पर्थमधील ऑप्टस स्टेडियमवर झालेल्या कसोटी सामन्यात ऑस्ट्रेलियाला प्रथमच पराभव पत्करावा लागला आहे.भारतीय संघाचा २९५ धावांनी विजय हा केवळ ऑस्ट्रेलिया विरूद्धच मोठा विजय नाही तर भारतीय संघाचा सेना देशांमधील सर्वात मोठा विजय ठरला. याआधी भारताने १९८६ मध्ये लॉड्समध्ये इंग्लंडचा २७९ धावांनी पराभव केला होता. अशा प्रकारे भारताला ३८ वर्षांनंतर सेना देशांमध्ये एवढा मोठा विजय मिळाला आहे. विदेशातील भूमीवर भारताचा सर्वात मोठा विजय २०१९ मध्ये संघाने नोंदवला, जेव्हा भारताने वेस्ट इंडिजचा ३१८ धावांनी पराभव केला. भारताने घरच्या मैदानावरही श्रीलंकेचा ३०० हून अधिक धावांनी पराभव केला आहे. एकूणच हा विजय भारताचा विदेशी भूमीवरील सर्वात मोठा विजय आहे.टीम इंडियासाठी हा विजय ऐतिहासिक ठरला आहे. भारताने यापूर्वी कधीही ऑस्ट्रेलियाविरुद्धचा कसोटी सामना ऑस्ट्रेलियात इतक्या मोठ्या फरकाने जिंकला नव्हता. हा विजय टीम इंडियाचा ऑस्ट्रेलियातील सर्वात मोठा कसोटी विजय आहे. ऑस्ट्रेलियाविरुद्ध टीम इंडियाचा हा दुसरा सर्वात मोठा विजय आहे. यापूर्वी टीम इंडियाने मोहालीत ऑस्ट्रेलियाचा ३२० धावांनी पराभव केला होता. पर्थमध्ये कसोटी सामना जिंकणारा बुमराह हा दुसरा आशियाई कर्णधार ठरला आहे. योगायोगाने यापूर्वीचा कर्णधारही भारतीय गोलंदाज होता. अनिल कुंबळेच्या नेतृत्वाखाली २००८ मध्ये भारताने WACA (पर्थचे जुने स्टेडियम) येथे विजय मिळवला होता.भारताची पहिल्या डावातील स्थिती पाहता टीम इंडिया या सामन्यात पुनरागमन करेल अशी आशा कोणालाच नव्हती. पण जसप्रीत बुमराहच्या नेतृत्वाखालील संघाने पर्थमध्ये आश्चर्यकारक कामगिरी केली. रोहित शर्माच्या अनुपस्थितीत कर्णधार असलेल्या बुमराहने संघाचे नेतृत्त्व करत ८ विकेट्स घेत भारताच्या विजयात मोठी भूमिका बजावली. इतर गोलंदाजांनीही बुमराहला चांगली साथ दिली. तर दुसऱ्या डावात भारताच्या यशस्वी जैस्वाल, केएल राहुल आणि विराट कोहली यांनी उत्कृष्ट फलंदाजी करत भारताच्या विजयाचा पाया रचला. भारताच्या ऑस्ट्रेलियावरील पर्थ कसोटीतील विजयासह SENA देशांमध्ये (दक्षिण आफ्रिका, इंग्लंड, न्यूझीलंड आणि ऑस्ट्रेलिया) धावांच्या बाबतीत कसोटी क्रिकेटमध्ये सर्वात मोठा विजय मिळवला. पर्थमधील ऑप्टस स्टेडियमवर झालेल्या कसोटी सामन्यात ऑस्ट्रेलियाला प्रथमच पराभव पत्करावा लागला आहे.

### इंडियासाठी हा विजय ऐतिहासिक ठरला

भारतीय संघाचा २९५ धावांनी विजय हा केवळ ऑस्ट्रेलिया विरूद्धच मोठा विजय नाही तर भारतीय संघाचा सेना देशांमधील सर्वात मोठा विजय ठरला. याआधी भारताने १९८६ मध्ये लॉड्समध्ये इंग्लंडचा २७९ धावांनी पराभव केला होता. अशा प्रकारे भारताला ३८ वर्षांनंतर सेना देशांमध्ये एवढा मोठा विजय मिळाला आहे. विदेशातील भूमीवर भारताचा सर्वात मोठा विजय २०१९ मध्ये संघाने नोंदवला, जेव्हा भारताने वेस्ट इंडिजचा ३१८ धावांनी पराभव केला. भारताने घरच्या मैदानावरही श्रीलंकेचा ३०० हून अधिक धावांनी पराभव केला आहे. एकूणच हा विजय भारताचा विदेशी भूमीवरील सर्वात मोठा विजय आहे.टीम इंडियासाठी हा विजय ऐतिहासिक ठरला आहे. भारताने यापूर्वी कधीही ऑस्ट्रेलियाविरुद्धचा कसोटी सामना ऑस्ट्रेलियात इतक्या मोठ्या फरकाने जिंकला नव्हता

# हेडच्या विकेटनंतर टीम इंडियाचा जल्लोष!

## ट्रॅव्हिस हेडच्या विकेटनंतर टीम इंडियाचे आक्रम सेलिब्रेशन

।नवी दिल्ली ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**भारत आणि ऑस्ट्रेलिया यांच्यातील बॉर्डर गावस्कर ट्रॉफीतील पहिला सामना पर्थ येथे खेळला जात आहे. या सामन्यात भारतीय संघाने यशस्वी जैस्वाल आणि विराट कोहली यांच्या शतकाच्या जौरावर ५३४ धावांचा पर्वत उभारला आहे. प्रत्युत्तरात ऑस्ट्रेलिया संघाची भारतीय गोलंदाजापुढे दाणादण उडाली. ऑस्ट्रेलिया संघाकडून ट्रॅव्हिस हेडने सर्वाधिक धावांचे योगदान दिले.**



त्याची विकेट भारतीय संघासाठी महत्त्वपूर्ण होती, जी जसप्रीत बुमराहने मिळवून दिली. या विकेटनंतर भारतीय संघाने एकच जल्लोष केला, ज्याचा व्हिडीओ व्हायरल होत आहे. भारतीय संघाने दिलेल्या ५३४ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना ऑस्ट्रेलिया संघाला सहावा धक्का ट्रॅव्हिस हेडच्या रुपाने बसला. कर्णधार जसप्रीत बुमराहने ट्रॅव्हिस हेडला यष्टिरक्षक पंतकरवी झेलबाद केले. तो १०१ चेंडूंत आठ चौकारांच्या मदतीने ८९ धावा करून बाद झाला. त्याने मिचेल मार्शसोबत सहाव्या विकेट्ससाठी ८७ चेंडूत ८२ धावांची भागीदारी केली होती, जी भारतीय संघासाठी डोकेदुखी ठरत चालली होती. तसेच ट्रॅव्हिस हेडला भारतीय संघासाठी नेहमी कर्दनकाळ राहिला आहे. त्यामुळे त्याची विकेट घेताच बुमराह-विराटसह संपूर्ण भारतीय संघाने आक्रमकपणे सेलिब्रेशन केले. भारतीय संघाने ऑस्ट्रेलियाविरुद्ध दुसऱ्या डावात ६ बाद ४८७ धावा केल्यानंतर डाव घोषित केला. यशस्वी जैस्वाल, विराट कोहली आणि केएल राहुल यांनी टीम इंडियासाठी शानदार फलंदाजी केली.

### फलंदाजांनी दाखवली आपली ताकद

जैस्वालने १६१, कोहलीने नाबाद १०० आणि राहुलने ७७ धावा केल्या. पहिल्या डावाच्या आधारे टीम इंडियाकडे ४६ धावांची आघाडी होती. त्यामुळे त्याने ऑस्ट्रेलियाला ५३४ धावांचे लक्ष्य दिले आहे.भारत आणि ऑस्ट्रेलिया यांच्यातील बॉर्डर गावस्कर ट्रॉफीतील पहिला सामना पर्थ येथे खेळला जात आहे. या सामन्यात भारतीय संघाने यशस्वी जैस्वाल आणि विराट कोहली यांच्या शतकाच्या जौरावर ५३४ धावांचा पर्वत उभारला आहे.